
# मंडळया व गट विभागिय प्रकल्पांसाठी सहकार्य करतात

मुलांना शिकवणाऱ्यांनी I1b हा अभ्यास वाचावा.

नहेम्याने यरूशलेमेच्या तटाच्या भिंती पुन्हा बांधण्यासठी इस्राएलाच्या वंशजांना एकत्र केले आणि प्रत्येक वंशाला जबाबदारीच्या कामाचे एकेक क्षेत्र ठरवून नेमून दिले. त्याने प्रथम झालेल्या नुकसानीची पाहणी केली, मग त्याप्रमाणे योजना आखल्या आणि त्यानंतर सशस्त्र संरक्षण पुरवले.



## 1. प्रार्थना व देवाच्या वचनाच्या द्वारे स्वतःची तयारी करा

"प्रिय प्रभू आमच्या भागातील मंडळयांना एकत्र काम करण्याची प्रेरणा मिळवी याकरिता कृपा करून ह्या अभ्यासाचा उपयोग करून घे."

पाहा 2 इतिहास 36:15-23 मध्ये यापूर्वी यरूशलेम शहराच्या बाबतीत काय घडले व का.

सुमारे 70 हून अधिक वर्षानंतर बाबेलमधील बंदिवान इस्राएल लोक पारसाचा राजा कोरेश याच्या मदतीने घरी परतण्यास सुरूवात झाली यरूशलेमेच्या तटाच्या भिंती पुन्हा बांधण्यास सुरूवात करण्यासाठी नहेम्याने सहा टप्प्यांमध्ये काम केले.

**टप्पा 1)** गरज आणि उद्दिष्ट स्पष्ट केले. पाहा नहेम्या अध्याय 1 मध्ये नहेम्याने यरूशलेम मधील त्रासाला कसे तोंड दिले.

- नहेम्याने प्रश्न विचारून प्रथम नुकसान किती झाले याचा अंदाज घेतला त्याने जे ऐकले त्याला त्याने कसा प्रतिसाद दिला? (पाहा वचन 4)
- नहम्याने त्याच्या लोकांची पापे कबूल केली या पापांमुळेच त्याच्या देशाला बराच त्रास सोसावा लागला. त्याने कोणकोणत्या पापांचा समावेश केला? (पाहा वचन 6)

**टप्पा 2)** वस्तुस्थितीची चौकशी केल्यावर सूज्ञता लाभावी याकरिता प्रार्थना करा. पाहा अध्याय 2 मध्ये इस्राएलच्या लोकांना मदत करण्याकरीता नहेम्याने स्वतःची कशी तयारी केली.

**टप्पा 3)** निश्चित जबाबदाऱ्या सोपवून द्या. पाहा अध्याय 3 मध्ये प्रत्येकाला आपआपल्या क्षमतेनुसार कामात सहभागी होता यावे याकरीता नहेम्याने प्रचंड मोठया कामाची व्यवस्था कशी लावली.

**टप्पा 4)** विरोध आणि अन्यायाचा ठामपणे सामना करा.

- पाहा अध्याय 4 मध्ये नहेम्याने विरोधाचा सामना कसा केला (त्याने प्रार्थना केली. प्रत्येकाने कसून काम केले. त्याने कमकुवत भागांकडे अधिक लक्ष दिले. देवावर भरवसा ठेवा आणि आपले काम नेटाने करा अशी त्याने कामकऱ्यांना विनंती केली. त्याने व त्याच्या लोकांनी संपूर्ण समर्पणाचे आदर्श उदाहरण समोर ठेवले)
- पाहा अध्याय 5 मध्ये ह्या ख्रिस्ती पुढाऱ्याने देवाच्या लोकांना कसा न्याय मिळवून दिला:
- नहेम्या आणि लोकांनी स्वेच्छेने अन्याय कसा थांबवला? पाहा वचने 7 व 15

**टप्पा 5)** खोटेपणा आणि टीकेच्या विरोधात ठामपणे उभे राहा. पाहा अध्याय 6 मध्ये ह्या प्रकल्पामध्ये नहेम्या आणि कामकऱ्यांच्या चिकाटीने देवाचे कसे गौरव झाले.

- नहेम्याने त्याच्या शत्रूंकडून केला जाणारा अडथळा किंवा दहशत यामुळे विचलीत होण्याचे कसे टाळले? पाहा देवाच्या साहाय्याने भिंत पुन्हा किती दिवसांत उभारली? पाहा वचन 15.
- यावरून त्यांच्या शत्रूंना इस्राएलाच्या देवाविषयी काय शिकायला मिळाले? (पाहा वचन 16.

**टप्पा 6 )** पूर्ण झालेल्या प्रकल्पासाठी देवाचे गौरव करा. पाहा नहेम्या 8:2-12 आणि 9:1-5 मध्ये देवाने त्याच्या लोकांवर केलेला आशीर्वादांचा वर्षाव.

**2. आठ्वडयातील कार्यक्रमांविषयी सहकाऱ्यांबरोबर योजना आखा.**

गरजा आणि स्थानिक रिवाजांनुसार कार्यक्रम निवडा.

- इतर ठिकाणी असणारा समाज आणि मंडळयांच्या गरजा जाणून घेण्यासाठी प्रश्न विचारा.
- इतर मंडळयांच्या पुढाऱ्यांना भेटा एकत्रितपणे काम करण्यासाठी योजना आखा आणि इतर गरजू ठिकाणी मदत पाठवा.
- देवासाठी महान प्रकल्याचे संयोजन करून तो पूर्ण करण्याकरीता नहेम्याने ज्या टप्प्याने काम केले त्या टप्प्यांनुसार काम करा.

**3. आगामी उपासना सभेविषयी सहकाऱ्यांबरोबर योजना आखा**


प्रसंगानुरूप कार्यक्रम निवडा.

उपासनेच्या वेळी प्रार्थना करा. देवाजवळ पातके कबूल करा. इतरांच्या गरजा तुम्हांला दाखवण्याची त्याला विनंती करा. निरनिराळया मंडळयांतील ख्रिस्ती लोकांना एकत्रित करण्याची देवाला विनंती करा, म्हणजे त्यांना एकत्रितपणे त्याची सेवा करता येईल.

ख्रिस्ती लोकांनी एकत्र येऊन मंडळी बाहेरच्या लोकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी काम केल्याबद्दल देवाची स्तुती करा. मागील आठवडयातील कार्यक्रमांचे अहवाल व साक्षी सांगण्यास सांगा.

नहेम्याच्या कथावृत्तांत्ताचे नाट्यीकरण करा किंवा सांगा. हा अभ्यास तुम्हांला आणखी काही आठवडे चालवता येईल.

नहेम्या अध्याय 1 व 2 सांगण्यासाठी एखाद्या मदतनीसाला तयार करा प्रथम प्रत्येकाला लक्षपूर्वक ऐकण्यास आणि आपल्या लोकांच्या गरजा जाणून घेण्यास तसेच या कार्यासाठी स्वत:ची तयारी करण्यासाठी नहेम्याने कोणती पावले उचलली ती लक्षात घेण्यास सांगा. कथावृत्तांत्त सांगून झाल्यावर विश्वासणाऱ्यांना त्यांना काय समजले ते विचारा (उत्तरे भाग 1 मध्ये दिली आहेत)



नहेम्याने त्याच्या प्रकाल्पाला विरोध करणाऱ्यांचा सामना कशा प्रकारे केला त्यांचे नाट्यीकरण करा.

**नहेम्या:** "आपल्या शहराच्या तटाच्या भिंती पुन्हा बांधण्यास देव आपल्याला साहाय्य करील."

**सनबल्लट:** हळूच नहेम्याच्या मागे उभे राहा तो गर्रकन अचानक वळाल्यावर म्हणा, "तुझे काम थांबव आता हे खूप झाले."

**नहेम्या:** "हे काम देवाने माझ्यावर सोपवले आहे. येथून चालता हो."

**सनबल्लट:** "तू यात कधीच यशस्वी होणार नाहीस आमच्या बरोबर ये" तुझ्याशी थोडे महत्वाचे बोलायचे आहे."

**नहेम्या:** "आम्ही बरेच मोठे काम हाती घतले आहे. ते थांबवून मला येता येणार नाही मी तुमच्याशी बोलायला आल्यावर काम का थांबवावे?"

**सनबल्लट:** "तू खूप मोठा धोका पत्करत आहेस!"

**नहेम्या:** "देव आमचे संरक्षण करील."

मुलांना त्यांनी तयारी केलेली नाटिका कविता आणि प्रश्न सादर करण्याची संधी द्या.

प्रभु भोजनाची ओळख करून देण्यासाठी नहेम्या 2:1–5 वाचा. नहेम्या राजाकडे प्याला घेऊन गेला परंतु आपण प्रभुच्या मेजापाशी येतो तेव्हा आपला राजा येशू त्याचा प्याला घेऊन आपल्याकडे येतो त्याच्या रक्तामुळे आमच्या पातकांची क्षमा होते आणि देवाशी आमच्या राजाशी आमचे नाते जुळते.

आठडयातील तुम्ही आखलेल्या कार्यक्रमांची घोषणा करा. कोणतेही आव्हान स्वीकारून एकत्रितपणे देवाची सेवा करण्यासाठी लोकांना संघटित करा प्रार्थना करा.

**पाठ करा 2 इतिहास 7:14**

दोन वा तीन जणांच्या गटांत एकमेकांना मदत करा. इतर मंडळयांच्या बरोबर प्रकल्पांमध्ये काम करण्यासाठी योजना मंजूर करा आणि एकमेकांना प्रोत्साहन द्या.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net